## थोडक्यात...

### भाजपा महानगरतर्फे 'सेवा पंधरवडा २०२५' निमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**परभणी-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या महानगर शाखेतर्फे परभणी जिल्ह्यात 'सेवा पंधरवडा २०२५' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून त्या निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सेवा पंधरवडा १७ सप्टेंबर रोजी मोदीजींच्या वाढदिवसापासून सुरू होऊन २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती पर्यंत विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पार पडणार आहे. या उपक्रमाच्या तयारीसाठी मंडळनिहाय कार्यशाळा घेण्यात आल्या. कार्यक्रमांचे नियोजन राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर, ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, माजी मंत्री सुरेशराव वरपूडकर, संघटनमंत्री संजय कौडगे, प्रेरणा वरपुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

'सेवा पंधरवडा' उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, नेत्र संजीवनी, विचारवंत व प्रबुद्ध नागरिकांचा गौरव, दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, वकृत्व व निबंध स्पर्धा, मॅरेथॉन, 'वोकल फॉर लोकल' उपक्रम, प्रदर्शन, स्वच्छता मोहिमा तसेच गरजूंसाठी सहाय्य अशा समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



**परभणी -** शहरातील स्टेशन रोड परीसरात जागोजाग कचऱ्यांचे ढीग दिसत आहेत यामुळे अस्वच्छतेचा आभाव दिसुन येत आहे. यामुळे नागरीकांचे आरोग्यांच्या समस्या उद्भवत आहेत याकडे मनपा आयुक्त यांनी लक्ष द्यावे अशी मागणी नागरीकांतुन होत आहे. (छाया- गजानन चव्हाण )

# शिक्षक म्हणजे संस्कारांची बीजे पेरणारा दीपस्तंभ – आ.डॉ.गुट्टे

## येत्या २८ सप्टेंबर रोजी रंगणार आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा



**गंगाखेड-** शाळेची वर्गखोली ही केवळ शिकवणीची जागा नसून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे पवित्र स्थान असते. आजच्या बदलत्या युगात शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण अधिक सुलभ, प्रभावी आणि परिणामकारक केले आहे. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता यांना दूर करून सुशिक्षित, सुजाण आणि सशक्त पिढी घडविण्याचे कार्य शिक्षक करीत आहेत. त्यांचा प्रत्येक शब्द विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया घडवतो, तर प्रत्येक कृती आदर्शाचा वारसा देऊन जातो. अशा शिक्षकांचे योगदान समाजजीवनाच्या उन्नतीसाठी आणि राष्ट्रनिर्मितीसाठी अतुलनीय आहे. कारण, शिक्षक हा केवळ ज्ञानाचा दाता नसून तो समाजाच्या विचारप्रवाहाला दिशा देणारा, संस्कारांची बीजे पेरणारा आणि विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश टाकणारा दीपस्तंभ असतो, असे स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे म्हटले आहे.

विद्यादानासारख्या पवित्र सेवेत आपण अखंडित कार्यरत असलेले शिक्षक हे समाजासाठी कायम आदर्श आहेत. कारण, त्यांनी केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर आदर्श विद्यार्थी आणि सुजाण नागरिक घडविण्याच्या ध्येयाने शिक्षकी पेशा स्वीकारला आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी आ.डॉ.गुट्टे संकल्पनेतून गंगाखेड विधानसभा कार्यक्षेत्रातील शिक्षक बंधू आणि भगिनींसह शिक्षण क्षेत्रातील विविध पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तींसाठी आमदार रत्नदीप आदर्श शिक्षक पुरस्काराने शहरातील साई वृंदावन लॉन्स येथे येत्या २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी केवळ गंगाखेड, पालम आणि पूर्णा तालुक्यातील शासकीय व निमशासकीय शाळेतील प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक, गटसाधन व्यक्ती, गटसमन्वयक, केंद्रप्रमुख, विस्ताराधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांना गौरविण्यात येणार असल्याचे आ.डॉ.गुट्टे यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात नमूद केले आहे.

शिक्षण क्षेत्रात १० वर्ष सेवा पूर्ण झालेल्या इच्छुक शिक्षकांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची ऑफलाईन माहिती संचिका तीन प्रतीत आपापल्या तालुक्यातील निवड समितीकडे स्वतः जमा करणे बंधनकारक होते. यादरम्यान अर्जदाराची दुसरीकडे बदली झाली असेल, तरी ५ सप्टेंबर रोजी कार्यरत असलेल्या शाळेवरील कार्य गृहीत धरले जाणार आहे. शिवाय, इच्छुकांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची निवड समितीमार्फत प्रत्यक्ष संबंधित शाळेस भेट देवून खातरजमा करण्यात येणार आहे. त्यानंतरच पुरस्कारार्थींची नावे अंतिम करण्यात येतील. विशेष म्हणजे या पुरस्कारासाठी कसल्याही प्रकारची शिफारसपत्रे चालणार नाहीत, असे निवड समितीने स्पष्ट केले आहे.

तसेच या नियोजित पुरस्कारसह तिन्ही तालुक्याच्या प्रत्येक बीटमधून ५ वर्ष सेवा पूर्ण केलेल्या प्रत्येकी एक आदर्श अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी कार्यकर्ती यांची सुध्दा पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुकांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी आणि बीट सुपरवायझर यांच्याकडून पडताळणी करण्यात येणार आहे. त्यानंतरही त्याही पुरस्कारांसाठी नावे अंतिम करण्यात येतील, असेही आ.डॉ.गुट्टे आणि निवड समितीने स्पष्ट केले आहे.

## पूर्णा येथे सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**परभणी -** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व श्री गुरु बुध्दिस्वामी शिक्षण प्रसारक संस्था पूर्णा संचलित श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय, पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय, पूर्णा येथे आयोजित करण्यात आलेला आहे. शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जिल्ह्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगाराना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने हा रोजगार मेळावा आयोजित केलेला आहे. या मेळाव्यास राज्यातील विविध नामांकित मोठे उद्योजक कंपन्या सहभाग नोंदविणार आहेत. जिल्ह्यातील बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी, बी.ई. पॉलिटेक्नीक इत्यादी शैक्षणीक पात्रता धारक उमेदवाराची बँक ऑफीसर (सर्व कोऑपरेटिव्ह बँक), बीजनेस डेव्हलपमेंट मॅनेजर, फिल्ड ऑफीसर, ट्रेनी ऑपरेटर, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ॲप्रेटशिष ट्रेनी, क्षेत्र अधिकारी (एसएफओ), क्षेत्र अधिकारी (आरओ), सेल्स रिप्रजेंटेटिव्ह, फिल्ड असीस्टंट ट्रेनी, ट्रेनी केंद्र मॅनेजर, विमा सल्लागार, विमा सखी इत्यादी पदांसाठी मुलाखातीव्दारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी किमान वेतन १८ हजार ते २५ हजार असणार आहे. महारोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी शासनाच्या (mahaswayam.gov.in) या वेबसाईटवर करावी महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नावनोंदणी करण्यासाठी दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय, पूर्णा येथे स्वखर्चाने सर्व उमेदवारांनी उपस्थित राहावे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी सदर मेळाव्यास सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त बा.सू.मरे यांनी केले आहे.

## हैदराबाद मुक्तिसंग्राम राष्ट्रीय भावनेतून लढला गेल्यामुळेच स्वातंत्र्य मिळाले –सुभाष ढगे

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा -** हैदराबाद मुक्तिसंग्राम हा तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र प्रदेश समिती आणि या तीन भाषिक प्रदेशातील शेतकरी, कष्टकरी यांनी एकत्र येऊन राष्ट्रीय भावनेतून लढा लढल्यामुळेच खऱ्या अर्थाने मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले असे प्रतिपादन व्याख्याते सुभाष ढगे यांनी सोमवार (दि.१५) रोजी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि स्वा. सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात यांच्या संयुक्त विद्यमाने हैदराबाद मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त हैदराबाद मुक्तिसंग्राम समजून घेताना या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष कुऱ्हे होते तर मंचावर प्राचार्य डॉ.के. राजकुमार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य इंजि. नारायण चौधरी, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या तथा गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. सुरेखा भोसले, अधिसभा सदस्य डॉ. विजय भोपाळे, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक



डॉ. भीमराव मानकरे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ढगे म्हणाले, हैदराबाद मुक्तिसंग्रामात शेतकरी, कष्टकरी, महिला पुरुष, युवकांनी आपला महत्त्वपूर्ण सहभाग घेऊन योगदान दिल्यामुळेच हा लढा निकराने लढला गेला. भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभाई पटेल, भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित नेहरू, स्वातंत्र्य लढ्याचे मार्गदर्शक महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी रामानंद तीर्थ व हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी यात महत्त्वाचे योगदान दिल्याचेही त्यांनी यावेळी आपल्या व्याख्यानात सांगितले. याप्रसंगी डॉ.के. राजकुमार यांनी आपल्या मार्गदर्शनात हैदराबाद मुक्ती लढ्यातील काही ऐतिहासिक संदर्भ देत सशक्त शेतकरी लढा या आंदोलनाचा उल्लेख करत शेतकरी लढ्याचे महत्त्व सांगितले. कम्युनिस्ट विचारधारेच्या शेतकरी कार्यकर्त्यांच्या योगदानाचेही महत्त्व त्यांनी मांडले. आजच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात जाऊन अभ्यास करून स्वातंत्र्याचा खरा इतिहास समाजासमोर आणला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले . इंजि. नारायण चौधरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या भित्तिपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक डॉ. शारदा बंडे यांनी प्रास्ताविक यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. प्रकाश सूर्यवंशी यांनी तर आभार डॉ. प्रभाकर किर्तनकार यांनी मानले.कार्यक्रमासाठी महाविद्यालयासह इतर महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संतोष कुऱ्हे, संयोजक डॉ. शारदा बंडे, डॉ. प्रकाश सूर्यवंशी, डॉ.प्रभाकर कीर्तनकार, डॉ.विजय भोपाळे, डॉ.अशोक कोलंबीकर, डॉ.संजय कसाब, डॉ.प्रभाकर सूर्यवंशी यांनी पुढाकार घेतला.

## कोल्हावाडीचा हिरवाईचा संकल्प : लोकसहभागातून ३ लाखांचा निधी, २५० नारळ व बॉटल पाम लागवड

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी –** सरकारचा कार्यक्रम आपला, पण अंमलबजावणी गावकऱ्यांच्या एकजुटीतून कशी साधता येते याचं उत्तम उदाहरण मानवत तालुक्यातील कोल्हावाडी गावाने घालून दिलं आहे. ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून आणि गावकऱ्यांच्या सहभागातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची सुरुवात एका आगळ्यावेगळ्या प्रयोगाने करण्यात आली.

गावकऱ्यांनी जवळपास ३ लाख रुपयांची लोकवर्गणी जमा करून गावच्या वेशीवर व रस्त्यालगत २५० नारळ व बॉटल पाम झाडांची लागवड केली आहे. झाडांच्या संवर्धनासाठी ठिबक सिंचनाची व्यवस्था करण्यात आली असून त्याची जबाबदारी स्थानिक युवकांकडे सोपवण्यात आली आहे. या कामासाठी कोणताही ठेकेदार, टेंडर किंवा सरकारी निधी न वापरता ग्रामस्थांनी श्रमदान, रोप खरेदी व लागवड स्वतःच्या खांद्यावर घेतली.

याच औचित्याने आदर्श शिक्षकदिगंबर भिसे यांच्यासंकल्पने तून 'माझा गाव माझा अभिमान' या मोहिमेअंतर्गत ग्रामसभेत गावातील सेवानिवृत्त व कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान झाडांची भेट देऊन करण्यात आला. यावेळी



प्रा. राम भिसे, प्रा. मधुकर भिसे, पोलीस कर्मचारी गुलाब भिसे यांचा गौरव झाला. आदर्श शिक्षक दिगंबर भिसे यांनी या उपक्रमाला 'बिनबुडाच्या गावाला आता भक्कम पाया' मिळाल्याची घोषणा करत ग्रामस्थांना प्रेरित केले.

ग्रामपंचायत सरपंच जिजाबाई आठवे, माजी सरपंच वर्षा भिसे, ग्रामपंचायत अधिकारी मनीषा लोमटे, आदर्श शिक्षक दिगंबर भिसे, बाबासाहेब धोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण गाव या अभियानासाठी झटत आहे. रस्त्यालगतची हिरवीगार झाडांची रांग फक्त सौंदर्यवर्धन करत नाही तर एकतेची ताकद व स्वबळावर विकास घडवण्याचा संदेशही देते.

आज शाळा, मंदिर परिसर तसेच मसानभरी क्षेत्र झाडांनी नटले असून कोल्हावाडीचा हा प्रयोग जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात आदर्श ठरत आहे.

## बोरी ग्राम आपत्ती व व्यवस्थापन द्रुत प्रतिसाद समिती स्थापन

(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)

**बोरी -** जिंतूर तालुक्यातील बोरी ग्रामपंचायत येथे ग्राम आपत्ती व्यवस्थापन व द्रुत प्रतिसाद समिती (VDMDSC) स्थापन बोरी, ता. जिंतूर, जि. परभणी ग्रामपंचायत बोरी तर्फे गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी व आपत्तीच्या प्रसंगी तात्काळ मदत मिळावी यासाठी ग्राम आपत्ती व्यवस्थापन व द्रुत प्रतिसाद समिती ( Village Disaster Management & Disaster Standing Committee – VDMDSC ) ची स्थापना करण्यात आली. दिनांक _१५/०९/२०२५ रोजी ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या विशेष बैठकीत ही समिती उपसरपंच श्रीमती शाहिन बेगम शेख रफिक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली. या बैठकीस मान्यवर तसेच विभागीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख मान्यवर व अधिकारी उपस्थित

✻ मा. अजय चौधरी, माजी उपाध्यक्ष,



जिल्हा परिषद परभणी. ए. पी. आय. सुनील गोपिनवर, सहाय्यक पोलीस निरीक्षक. डॉ. बी. के. पवार, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय बोरी श्री. एस. एस. रोकडे, सहाय्यक अभियंता, महावितरण (एमएसईबी) डॉ. व्ही. एल. जाधव पशुवैद्यकीय अधिकारी .सौ. पी. एस. वैद्य, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. जी. आर. कोंडे, ग्राम महसूल अधिकारी श्री. पी. जे. खंदारे, चौ. प्रतिनिधी श्री. पी. बी. रांजण, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच् माध्यमिक शाळा बोरी सर्व ग्रामपंचायत सदस्य

✻ आशा कार्यकर्त्या अंगणवाडी सेविका ग्रामपंचायत कर्मचारी

कार्यक्रमातील ठळक मुद्दे

प्रास्ताविक : ग्रामपंचायत अधिकारी श्री. विनायक पुंड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत ग्राम आपत्ती व्यवस्थापन समितीच्या उद्दिष्टांची सविस्तर माहिती दिली.

आभार प्रदर्शन : कार्यक्रमाचा समारोप करत श्री. नागरे यांनी उपस्थित सर्व मान्यवर व ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानले.

समितीचे उद्दिष्ट– नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींसाठी पूर्वतयारी, जनजागृती व तात्काळ प्रतिसाद.

✻ बचाव पथक, प्राथमिक उपचार व सुरक्षित निवारा यांचे नियोजन.

✻ गावातील जोखमीच्या ठिकाणांची नोंद घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना.

महत्त्वाचे निर्णय

✻ आपत्ती काळात २४७ नियंत्रण कक्ष ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत राहील.

✻ जलसाठा, वीजपुरवठा, वैद्यकीय साहित्य व तात्पुरत्या निवाऱ्यासाठी स्वतंत्र जबाबदार सदस्य निश्चित करण्यात आले.

✻ आपत्ती व्यवस्थापन निधी तयार करण्यास मान्यता देण्यात आली.

उपसरपंच श्रीमती शाहिन बेगम शेख रफिक यांनी सर्व ग्रामस्थांना आपत्तीपूर्व तयारीसाठी सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले. संपर्क ग्रामसेवक नियंत्रण कक्ष (२४७) ग्रामपंचायत बोरी ता. जिंतूर, जि. परभणी

## पाथरी नगर परिषदेची सत्ता हातात द्या शहर पत्रेमुक्त करतो–सईद खान

(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)

**पाथरी -** लवकरच स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागणार आहेत.यामध्ये पाथरी नगरपरिषद ची सत्ता शिवसेनेच्या हाती द्या. माझ्या नेतृत्वात नगरसेवकांना काम करण्याची संधी द्या.मग पहा पाथरी शहराच्या अन्य विकासासह पाथरी शहराला घरकुल योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात घरकुल आणून पत्रेमुक्त घरे निर्माण करू.अशी ग्वाही शिवसेना नेते सईद खान यांनी आज इंदिरानगर येथे दिली.यावेळी त्यांच्यासोबत माजी नगराध्यक्ष लालू खान, माजी नगरसेवक एजाज खान, अजय पाथरीकर, दीपक टेहरे,



खालेद चाऊस, एल. आर कदम, खालेद दादा, मोहसीन खान, डॉ.वैराळ, सोहेल अहेमद आत्तार, असलम अत्तार, अजीमोद्दीन तांबोळी, मुबारक चाऊस ,नसीर बेग, नसीब खान, असलम शेख ,सोहेल मुबारक अत्तार, जावेद अत्तार, रोहिदास गवारे, भागवत कांबळे, शहेबाज कुरेशी इत्यादींची उपस्थिती होती सर्वांनी आपापले मनोगत व्यक्त करत नगरपालिकेत शिवसेनेला भरघोस मते मिळवून देऊ असा विश्वास व्यक्त केला.कार्यक्रमाचे प्रस्ताविक खालेद दादा यांनी तर आभार खिजर फारोकी यांनी मानले. भविष्यात होऊ घातलेली पाथरी नगरपालिकेची निवडणूक नजरेसमोर ठेवत सईद खान यांनी संपूर्ण पाथरी शहरातील प्रभागामध्ये निवडणूक नियोजन बैठकांचा धडाका लावला आहे.मागील दोन दिवसापासून जैतापूर मोहल्ला, माळीवाडा,आदर्श नगर, इंदिरानगर,जुना आठवडी बाजार, महबूब शहा फंक्शन हॉल,नामदेव नगर इत्यादी व अन्य सर्वच वार्डात ते अशा बैठका घेत आहेत.

## मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके यांची विधी महाविद्यालयास भेट!



(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)

**सोनपेठ-** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके यांनी परभणीतील श्री शिवाजी विधी महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांशी हितगुज साधत अडचणी जाणून घेतल्या.१५ सप्टेंबर रोजी दिलेल्या या भेटीत सोळंके यांच्या समवेत प्राचार्य डॉ.पी.एल. धर्मापुरीकर,प्रा. डॉ.देशमुख,प्रा.डॉ.विजय माकणीकर,प्रा.डॉ. वसीम खान,फुलझळके,प्रा.डॉ.काशिनाथ नेहरकर यांच्यासह महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.यावेळी महाविद्यालयाच्या प्रगतीबाबत सोळंके यांनी समाधान व्यक्त करत उपस्थित कर्मचाऱ्यांचे तोंडभरून कौतुक केले.या भेटीमध्ये महाविद्यालयाच्या किरकोळ समस्या व अडचणीवर एकता विधी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुमित परिहार यांनी संघटनेच्या माध्यमातून सोळंके यांच्याशी चर्चा करत त्या सोडवण्याची विनंती केली. सोळंके यांच्याकडून त्यांना यावर सकारात्मक उत्तर मिळाले समवेत विधी महाविद्यालयातील विद्यार्थी निलेश देशमुख,अभय हजारे,करण गायकवाड,सतीश हनवते यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्म योध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao